महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६१३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : २२५३/मगकसे-लिदुकतां(मुख्य)/उ.ता./२०२३/१६** **दिनांक** :- ०९ जानेवारी, २०२४

# - घोषणा -

**विषय** :- महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - २०२३, या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक १७ डिसेंबर, २०२३** रोजी आयोजित '**महाराष्ट्र गट-क सेवा, मुख्य परीक्षा - २०२३,** या स्पर्धा परीक्षेच्या **पेपर क्र. १ व पेपर क्र. २** या विषयाच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या **प्रश्नपुस्तिकेच्या** चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेच्या पेपर क्रमांक २ मधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | **संच A** | **संच B** | **संच C** | **संच D** |
|---|---|---|---|---|
| **पेपर क्रमांक २ प्रश्न क्रमांक** | **९** | **१०** | **५** | **१०** |
| | **२१** | **३०** | **२६** | **३२** |
| | **२३** | **२८** | **२१** | **२९** |
| | **२४** | **३१** | **२३** | **२४** |
| | **३२** | **२५** | **२९** | **२७** |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील **दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व ०१ जुलै, २०२२** रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक १४ जानेवारी, २०२४** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई

ठिकाण : नवी मुंबई